नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १३४ | Issue - 134 | वार सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४ | Blow- Monday Date 30 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## प्रचाराची सांगता; जम्मूकाश्मीरमध्ये अखेरच्या टप्प्यासाठी उद्या मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या तिसऱ्या व अखेरच्या टप्प्यातील प्रचार रविवारी संध्याकाळी समाप्त झाला. या टप्प्यासाठी मंगळवार, १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात पाकिस्तान, अनुच्छेद ३७०, दहशतवाद आणि आरक्षणासह विविध मुद्द्यांवर राजकीय पक्षांनी प्रचार केला.

जम्मू, उधमपूर, सांबा आणि जम्मू विभागातील कठुआ आणि उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला, बांदीपोरा आणि कुपवाडा या सात जिल्ह्यांमधील ४० विधानसभा मतदारसंघांत या टप्प्यासाठी मतदान होणार आहे. माजी उपमुख्यमंत्री व काँग्रेस नेते ताराचंद आणि पीडीपीचे मुझफ्फर बेग यांच्यासह ४१५ उमदेवार रिंगणात आहेत. याआधीच्या टप्प्यात मतदानाची टक्केवारी चांगली होती. १८ सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्यात ६१.३८ टक्के आणि २६ सप्टेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यात ५७.३१ टक्के मतदान झाले होते. ऑगस्ट २०१९ मध्ये राज्यघटनेचे अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर जम्मू व काश्मीरमधील ही पहिली विधानसभा निवडणूक आहे. निवडणुकीचे निकाल ८ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहेत.



**प्रचारसभेत खरगेंची प्रकृती बिघडली**

जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील जसरोटा पट्ट्यात रविवारी प्रचारसभेला संबोधित करताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची प्रकृती बिघडली. वैद्याकीय उपचार घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा भाषणाला सुरुवात केली. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीनंतर खरगे यांची प्रकृती स्थिर असल्याचे काँग्रेस नेत्यांनी सांगितले. ''माझे वय ८३ आहे. मला इतक्या लवकर मृत्यू येणार नाही. पंतप्रधान मोदींना सत्तेवरून हटवेपर्यंत मी जिवंत राहीन'' असे खरगे यांनी सांगितले.

## सोलापूर हवाई मार्गाने जोडले गेल्याने उद्योग व्यवसायाला चालना मिळणार : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : नूतनीकरण झालेल्या सोलापूर विमानतळाचे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून दूरदृष्यप्रणाली पद्धतीने लोकार्पण झाले. सोलापूर जिल्हा विमान वाहतुकीने जोडला गेल्यामुळे येथील उद्योग व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. तसेच देश विदेशातील विठ्ठल भक्तांना दर्शनासाठी हवाई सुविधा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी सोलापूर विमानतळ येथे आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली उगले, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, माजी सनदी अधिकारी प्रवीण सिंह परदेशी, सोलापूर विकास मंचचे केतन शहा, माजी खासदार डॉक्टर जयासिध्देश्र्वर स्वामी, माजी आमदार नरसिंग मेंगजी यांच्यासह सोलापुरातील व्यवसायीक, उद्योजक विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, भगवान विठ्ठलाच्या आशीर्वादाने त्यांच्या भक्तांना हा उपहार मिळाला आहे. सोलापूर हे थेट एअर कनेक्टिव्हिटीशी जोडले गेले आहे. तिथल्या विमानतळाची सर्व प्रकारची क्षमता वाढवली असल्याने विठ्ठल भक्तांसह यात्रेकरूंना नवनवीन सुविधा मिळणार आहेत. देश विदेशातून येणाऱ्या भक्तांना भगवान विठ्ठलाच्या दर्शनाला थेट सोलापूरला येता येणार आहे. यामुळे सोलापूर मध्ये व्यापार, व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वासही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. या कार्यक्रमाची सुरूवात श्रीमद्ववीरशैव गुरूकुल होटगी मठ मधील विद्यार्थ्यांनी गणेश वंदन करून व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक विमानतळ संचालक सी.एन.वंजारा यांनी केले तर आभार प्रदर्शन विमानतळ व्यवस्थापक चंपला बा यांनी केले.

**सोलापूर विमानतळाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण**




### थोडक्यात

**पोलीस कॉन्स्टेबलला गाडीखाली चिरडलं; पोलीस हवालदाराचा जागीच मृत्यू**

नवी दिल्ली : दिल्लीमधील नांगलोई परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका कार चालकाने एका पोलीस हवालदाराला त्याच्या गाडीखाली चिरडल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये पोलीस हवालदाराचा मृत्यू झाला आहे. गाडी चालवणारा व्यक्ती हा मद्य पुरवठादार असल्याची माहिती सांगितली जात असून तो सध्या फरार झाला आहे. यासंदर्भात दिल्ली पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. माहितीनुसार, नांगलोई पोलीस ठाण्यात असलेले पोलीस हवालदार संदीप यांना एका चारचाकी गाडी बेदरकारपणे येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलीस हवालदाराने कार बेदरकारपणे चालवली जात असल्याचं पाहिलं आणि कार चालकाला गाडी बेदरकारपणे न चालवण्यास सांगितलं. मात्र, यावेळी अचानक ओव्हरटेक करणाऱ्या कारचा वेग वाढला आणि त्या कारने पोलीस हवालदार संदीप यांना पाठिमागून जोराची धडक दिली. तसेच पोलीस हवालदार संदीप यांना १० मीटरपर्यंत फरफटत नेलं. यानंतर पुन्हा पुढे उभ्या असलेल्या दुसऱ्या एका कारला त्या गाडीने धडक दिली.

## पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईनप्रणालीद्वारे पुणे मेट्रोच्या टप्पा १ अंतर्गत जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानक मार्गावरील प्रवासी सेवेचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ तर टप्पा १ चा दक्षिणी विस्तार स्वारगेट ते कात्रज मार्गिकेचे भूमि पूजन करण्यात आले. तसेच त्यांच्या हस्ते भिडेवाडा येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पहिली मुलींची शाळा स्मारकाचे भूमिपूजन, सोलापूर विमानतळाचे उद्घाटन, बिडकीन औद्योगिक क्षेत्र राष्ट्राला अर्पण करण्यात आले. या अनुषंगाने स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

पुण्याचा चहूबाजूनी विस्तार होत असताना माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, उद्योग, शैक्षणिक संस्थेचे जाळे वाढत आहेत. याचा वाहतूक व्यवस्थेवर ताण येत असून प्रदूषणातही वाढ होत आहे, त्यामुळे पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी असून याकरीता मेट्रोसारखे प्रकल्प महत्वाचे आहेत, आगामी काळात मेट्रोचे जाळे वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दूरदृष्यप्रणालीद्वारे तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, माधुरी मिसाळ, भिमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, आश्विनी जगताप, आदी मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध विकास कामांचे ऑनलाईन लोकार्पण आणि भूमिपूजन**

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या मदतीने विविध प्रकल्प राबविण्यात येत आहे. आज राज्यात विविध उद्योग येत असून उद्योगाला चालना देण्याकरीता राज्य शासन सहकार्य करीत आहेत. राज्यात ५२ टक्के परदेशी गुंतवणूक झाली आहे, विविध क्षेत्रातील उद्योजक राज्याकडे आकर्षित होऊन उद्योगाला चालना देत आहेत. आपले राज्य उद्योगस्नेही झाले असून उद्योग आणि पायाभूत सुविधेत देशात महाराष्ट्र अग्रेसर झाले आहे.

**पुरंदर विमानतळाकरीता भूसंपादनाची कार्यवाही करा**

**पुरंदर विमानतळाकरीता लवकरात लवकर जागा अधिग्रहित करुन शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला द्यावा. याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरीता केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालय आणि उद्योग मंत्रालय यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करावे, आगामी काळात पुरंदर विमानतळाचे काम सुरु करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पहिली मुलींची शाळा भिडेवाडा येथील स्मरकाकरीता राज्य शासनाने पुढाकार घेतला असून याठिकाणी ऐतिहासिक स्मारक होत आहे, असेही श्री. शिंदे म्हणाले.**

## पाकिस्तानला परिणाम भोगावे लागतील : जयशंकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी (२८ सप्टेंबर) पाकिस्तानबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, पाकिस्तानबरोबरचा पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा आपल्याला सोडवायचा आहे. त्यांना पाकव्याप्त काश्मीर रिकामं करायला लावण्याचा मुद्दा अद्याप बाकी आहे. सीमेपलीकडे पाकिस्तान दहशतवादी धोरणं राबवत आहे, मात्र ते त्यात कधीच यशस्वी होणार नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. आजही ते त्यांच्या कर्माची फळं भोगत आहेत. जयशंकर यांनी शनिवारी संयुक्त राष्ट्र महासभेच्या म्हणजेच यूएनजीएच्या ७९ व्या सत्राला संबोधित केलं.

एस जयशंकर म्हणाले, भारत व पाकिस्तानमधील केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. तो म्हणजे पाकिस्तानने बेकायदेशीरमध्ये बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांना रिकामा करायला लावायचा आहे. तो भारताचा भूभाग आहे. तसेच सीमेपलीकडून भारताविरोधात होत असलेल्या दहशतवादी कारवायांचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे.

भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणाले, पाकिस्तान त्यांच्या कर्माची फळं भोगतोय. त्यांचं 'कर्म' आज त्यांच्याच समाजाला गिळंकृत करत आहे. काही देश त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या शक्तींमुळे किंवा परिस्थितीमुळे मागे राहिले आहेत. परंतु, काही देश असेही आहेत जे स्वतःच्या चुकांमुळे मागे राहिले. ज्यांनी जाणूनबुजून असे निर्णय घेतले की जे त्यांच्या देशासाठी घातक ठरले. (पान २ वर...)

**सोहळयास सर्व जातीधर्मीय जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन**

**केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची माहिती**

## रिपब्लिकन पक्षाचा ६७ वा वर्धापन दिन सोहळा ३ ऑक्टोंबर रोजी सातारा नगरीत साजरा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा यंदा ६७ वा वर्धापन दिन असून हा वर्धापन सोहळा येत्या ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता ऐतिहासीक सातारा नगरीत तोफखाना येथील तालीम संघ मैदानात मोठया उत्साहात साजरा होणार आहे. या वर्धापन दिन सोहळयाचे उद्घाटन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्र राजे भोसले उपस्थित राहणार आहेत.



यावेळी अध्यक्षस्थानी रिपाइंचे राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे आणि स्वागताध्यक्ष पदी रिपाइंचे साताऱ्याचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड राहणार आहेत. या सोहळयाचे निमंत्रक रिपाइंचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे असुन रिपाइंचे माजी मंत्री अविनाश महातेकर, कार्याध्यक्ष बाबुराव कदम, भूपेश थुलकर, विजय अगलावे, मोहन भोयर, सुरेश बार्शिंग, सिद्धार्थ कासारे, रमेश मकासरे, प्रकाश लोंढे, प्रकाश मोरे, मिलिंद शेळके, बाळाराम गायकवाड यासह राज्यभरातील सर्व प्रमुख पदाधिकारी ज्येष्ठ नेते या सोहळयास उपस्थित राहणार आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना ३ ऑक्टोंबर १९५७ रोजी करण्यात आली. त्या प्रित्यर्थ दरवर्षी ३ ऑक्टोंबरला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन दरवर्षी नित्यनियमाने साजरा केल्या जातो. यंदा रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन ऐतिहासीक सातारा नगरीत साजरा होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासीक सातारा नगरीत रिपब्लिकन पक्षाचा ६७ वर्धापन दिन यंदा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळयाच्या प्रारंभी सातऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळयाला अभिवादन करुन तसेच येथील भिमाई स्मरकाला अभिवादन करुन रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिन सोहळयास प्रारंभ करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजघराण्यातील वारस असणारे खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्र सिंह राजे भोसले यांना या सोहळयास प्रमुख अतिथी म्हणुन निमंत्रीत करण्यात आले आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साताऱ्यातील प्रतापसिंह विद्यालयात इयता पहिलीत प्रवेश घेवून शिक्षण घेतले होते. त्या ऐतिहासीक आठवणींना सातारा शहराने जपुन ठेवले आहे. त्यामुळे ऐतिहासीक सातारा नगरीत रिपब्लिकन पक्षाचा ६७ वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेत दिली. रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिन सोहळयास राज्यभरातील हजारो रिपब्लिकन कार्यकर्ते आणि आंबेडकरी अनुयायी उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन वर्धापन दिन सोहळयास सर्व जातीधर्मीय जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

**रिपब्लिकन पक्षाची विधानसभा निवडणुकीत १२ जागांची मागणी**

**रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची नुकतीच भेट घेतली विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगणाने जागा वाटपाबाबत पत्र देवून रिपब्लिकन पक्षाला विधानसभेच्या १० ते १२ जागा सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र अशा संबंध महाराष्ट्रातील निवडक जागांची यादी देवुन रिपब्लिकन पक्षाला १० ते १२ जागा सोडण्याची भाजपकडे मागणी केली आहे. तसेच रिपब्लिकन पक्षाला १ विधानपरिषद सदस्यत्व (एमएलसी) आणि २ महामंडळाची चेअरमन पदे आणि राज्यातील महामंडळाची सदस्य पदे रिपब्लिकन पक्षाला देण्यात यावी अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भाजपला करण्यात आली आहे. अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.**

## संपादकीय....

# पाकची कोंडी

भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी नुकतेच पाकिस्तानबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, पाकिस्तानबरोबरचा पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा आपल्याला सोडवायचा आहे. त्यांना पाकव्याप्त काश्मीर रिकामं करायला लावण्याचा मुद्दा अद्याप बाकी आहे. सीमेपलीकडे पाकिस्तान दहशतवादी धोरणं राबवत आहे, मात्र ते त्यात कधीच यशस्वी होणार नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. आजही ते त्यांच्या कर्मांची फळं भोगत आहेत. जयशंकर यांनी शनिवारी संयुक्त राष्ट्र महासभेच्या म्हणजेच यूएनजीएच्या ७९ व्या सत्राला संबोधित केलं. एस जयशंकर म्हणाले, भारत व पाकिस्तानमधील केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. तो म्हणजे पाकिस्तानने बेकायदेशीरमध्ये बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांना रिकामा करायला लावायचा आहे. तो भारताचा भूभाग आहे. तसेच सीमेपलीकडून भारताविरोधात होत असलेल्या दहशतवादी कारवायांचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणाले, पाकिस्तान त्यांच्या कर्माची फळं भोगतोय. त्यांचं 'कर्म' आज त्यांच्याच समाजाला गिळंकृत करत आहे. काही देश त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या शक्तींमुळे किंवा परिस्थितीमुळे मागे राहिले आहेत. परंतु, काही देश असेही आहेत जे स्वतःच्या चुकांमुळे मागे राहिले. ज्यांनी जाणूनबुजून असे निर्णय घेतले की जे त्यांच्या देशासाठी घातक ठरले. याचं सर्वात मोठं उदाहरण म्हणजे आमचा शेजारी देश पाकिस्तान. एस. जयशंकर म्हणाले, आम्ही काल याच मंचावरून काही चुकीच्या गोष्टी ऐकल्या. त्यामुळे मला भारताची भूमिका स्पष्ट करायची आहे. सीमेपलीकडील दहशतवादाचे पाकिस्तानचे धोरण कधीच यशस्वी होणार नाही. याची त्यांना शिक्षा मिळेल. ते त्या शिक्षेपासून स्वतःचा बचाव करू शकणार नाहीत. त्यांच्या कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. भारत आणि पाकिस्तानमध्ये आता केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. पाकिस्तानने बेकायदेशीरपणे भारताची जमीन बळकावली आहे. पाकिस्तानने बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांनी मोकळा करावा. दहशतवाद आणि त्यांच्या संघटनांबरोबरचे संबंध संपुष्टात आणावेत. दहशतवाद हा जगातील कोणत्याही समाजाच्या, धर्मांच्या शिकवणीच्या विरोधात आहे.



# निर्भय कन्या अभियानांतर्गत शालेय विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर /प्रतिनिधी : कानिफनाथ विद्यालय भिवरी ता. पुरंदर जि. पुणे येथे उपविभागीय अधिकारी पुरंदर :श्रीमती वर्षा लांडगे व उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग :मा. तानाजी बरडे साहेब यांच्या उपस्थितीत निर्भय कन्या अभियानाअंतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले,युनिक एकता फाउंडेशन च्या वतीने नीलम निकम मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रशिक्षण देण्यात आले,या कार्यक्रमाचे आयोजन ऍड,सौ गीतांजली ढोणे यांनी केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग मा. तानाजी बरडे साहेब यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की महिला व विद्यार्थिनींनी आपल्या स्व संरक्षणासाठी शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त असले पाहिजे,यासाठी गावोगावी तक्रार पेटीचे आयोजन केलेले आहे,नी संकोचपणे आपण आपली तक्रार त्या पेटीमध्ये टाकली पाहिजे.

आपल्या प्रास्ताविकामध्ये ऍड सौ गीतांजली ढोणे यांनी सांगितले की बदलापूरच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून खऱ्या अर्थाने अशा प्रशिक्षणाची गरज आहे महाराजांच्या लेकी या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींसाठी मोफत प्रशिक्षण व महिलांसाठी मार्गदर्शन पर कार्यक्रम आम्ही राबवत आहोत. सदर कार्यक्रम प्रसंगी सासवड पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील,भिवरी गावच्या सरपंच सौ मोनाली कटके शांताराम आबा कटके, गुलाब आप्पा घिसरे (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष) तसेच संदीप घिसरे,धोंडीबा शेट कटके, शेखर कटके, हनुमंत साळुंखे, नीताताई काळे, कानिफनाथ विद्यालयातील सर्व शिक्षक स्टाफ,विद्यार्थिनी व विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ मोहिनी लोणकर यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार श्री विजय गुरव सर यांनी मानले.

# पाकिस्तानला परिणाम भोगावे लागतील : जयशंकर

(पान १ वरून..) याचं सर्वात मोठं उदाहरण म्हणजे आमचा शेजारी देश पाकिस्तान.

एस. जयशंकर म्हणाले, आम्ही काल याच मंचावरून काही चुकीच्या गोष्टी ऐकल्या. त्यामुळे मला भारताची भूमिका स्पष्ट करायची आहे. सीमेपलीकडील दहशतवादाचे पाकिस्तानचे धोरण कधीच यशस्वी होणार नाही. याची त्यांना शिक्षा मिळेल. ते त्या शिक्षेपासून स्वतःचा बचाव करू शकणार नाहीत. त्यांच्या कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. भारत आणि पाकिस्तानमध्ये आता केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. पाकिस्तानने बेकायदेशीरपणे भारताची जमीन बळकावली आहे. पाकिस्तानने बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांनी मोकळा करावा. दहशतवाद आणि त्यांच्या संघटनांबरोबरचे संबंध संपुष्टात आणावेत. दहशतवाद हा जगातील कोणत्याही समाजाच्या, धर्मांच्या शिकवणीच्या विरोधात आहे.

# किल्लारी भूकंपातील किशोरी विकास कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रस्तावना :- ३० सप्टेंबर १९९३ रोजी, गणपती विसर्जनाच्या दिवशी, किल्लारीस झालेल्या प्रलयंकारी भूकंपास आता ३१ वर्षे पूर्ण झालीत. या भूकंपानंतर आम्ही म्हणजेच अफार्म, या महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांच्या संघटनेने भूकंप झाल्याच्या तिसऱ्या दिवसापासून, भूकंपग्रस्त भागात आपत्ती निवारण व पुनर्वसन कार्यक्रम हाती घेतला व १८ गावांतील आपत्तीग्रस्तांना तात्पुरते निवारे, जीवनावश्यक साहित्याचे वाटप, शेतीसाठी मदत, महिला विकास, किशोरी विकास, महिला संस्था व्यासपीठ, सेंद्रिय शेती व्यासपीठ, संस्था चालक व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणे व कार्यशाळा तसेच त्या अनुषंगिक प्रशिक्षण साहित्य निर्मिती असे अनेक कार्यक्रम राबवले. त्यातीलच एक महत्त्वाचा कार्यक्रम होता किशोरी विकास. या कार्यक्रमाच्या अनेक आठवणी आजही माझ्या स्मरणात ताज्या आहेत. भूकंपग्रस्त भागातील किशोरींसाठी, त्यावेळी आम्ही सुरू केलेला हा कार्यक्रम पुढील दशकात, महाराष्ट्रातील अनेक संस्थांनी हाती घेतला. त्यामुळेच, आमच्या या कार्यक्रमाची माहिती सर्वांना व्हावी, यासाठीच मी हा लेख लिहिला आहे.

किशोरी विकास कार्यक्रम, निर्मितीचा इतिहास :- भूकंपग्रस्त भागात आपत्ती निवारण व पुनर्वसन तसेच मानसिक आरोग्य सेवा कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना, आमच्या कार्यकर्त्यांचा घराघरात संबंध येत होता. त्यामुळे या कार्यक्रमाच्या माध्यमातून, भूकंपग्रस्त भागातील किशोरवयीन मुलींच्या अनेक समस्या आमच्या निदर्शनास आल्या व या मुलींसाठी आपण काम केले पाहिजे याची जाणीव आम्हास झाली. त्यामुळे, हे काम हाती घेण्यापूर्वी किशोरवयीन मुलींच्या नेमक्या समस्या काय आहेत व त्यासाठी आपण काय केले पाहिजे याचा आम्ही अभ्यास केला. त्यासाठी, भूकंपग्रस्त भागात काम करणाऱ्या, अन्य संस्थांतील महिला कार्यकर्त्यांची आम्ही मदत घेतली. त्यासाठी, या विषयावर आम्ही त्यांच्या दोन कार्यशाळा घेतल्या. त्यात भूकंपग्रस्त भागातील किशोरवयीन मुलींच्या समस्या व त्यावरील उपाय योजना याविषयावर भरपूर विचार मंथन झाले व त्यातूनच १२ ते १८ वयोगटातील मुलींसाठी आमचा किशोरी विकास कार्यक्रमाचा कृती आराखडा तयार झाला.

भूकंपात झालेल्या जिवितहानीत, अनेक घरातील कर्त्या महिलांचे मृत्यू झाले होते. त्यामुळे, कुटुंबांची व घरातील लहान भावंडांची जबाबदारी, घरातील मोठ्या मुलींवर आल्याने त्यांना अकाली प्रौढत्व आले होते. त्यामुळे, अनेक मुलींना शिक्षण सोडून कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागली होती. वडिलांचा मृत्यू झाल्यास एक वर्षांच्या आत मुलीचे लग्न करावे लागते, या स्थानिक रुढीमुळे अनेक मुलींचे वर्षभरातच विवाह झाले. अनेक विधुरांनी जवळच्या नात्यातील किंवा त्यांच्या पेक्षा वयाने कमी असणाऱ्या मुलींशी विवाह केले. चांगले स्थळ मिळत आहे म्हणून, वयाचा विचार न करता नातेवाईकांनी मुलींचे प्रौढांशी किंवा बिजवरांशी विवाह लावून दिले. याबरोबरच मुलींच्या लैंगिक शोषणाचे प्रमाण वाढले होते वा तशा शक्यता निर्माण झाल्या होत्या. निराधार मुलींच्या स्थावर मालमत्तेवर डोळा ठेवून, अनेक नातेवाईकांनी खोट्या प्रेमापोटी मुलींना जवळ केले होते. गावांच्या नवीन संरचनेमुळे, वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक एकमेकांचे शेजारी झाले होते. त्यामुळेही, मुलींबाबत काही नवीन प्रश्न निर्माण झाले होते. अशा कारणांमुळे, किशोरी मुलींची स्थिती गंभीर बनली होती. यावेळी भूकंपग्रस्त भागात, किशोरी मुलींसाठी फारशा संस्था काम करीत नव्हत्या. त्यामुळेच, किशोरवयीन मुलींसाठी काही विशेष कार्यक्रम हाती घेण्याची गरज आम्हास प्रकर्षाने वाटली. त्यामुळे, ज्या गावात आमचा मानसिक आरोग्य सेवा कार्यक्रम सुरू होता, त्याच किल्लारीवाडी, तळणी, लिंबाळा, गुबाळ, नांदुर्गा, सास्तुर, तावसिगड, पेठसांगवी, कोंडजीगड, मुर्शादपुर, काटेचिंचोली, उदतपुर, एकोंडी, राजेगांव व रेबे चिंचोली या १५ गावात आम्ही, किशोरी विकास कार्यक्रम सुरू केला. त्यासाठी प्रत्येक गावात किशोरी मंडळाची स्थापना केली. तसेच त्यासाठी संघटीका म्हणून, गावातीलच सुशिक्षित, गरजू व तरुण महिलांची निवड केली. त्यानंतर, किशोरी विकास कार्यक्रम कसा सुरू करायचा, मुलींना नेमके काय शिकवायचे, कोणते उपक्रम हाती घ्यायचे या विषयीचा, एक वर्षाचा कृती आराखडा आम्ही तयार केला व त्यानुसार सर्व संघटिकांना आवश्यक प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणानंतर संघटिकांनी गावात जावून, या कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थितीची पाहणी केली. किशोरी मंडळासाठी जागा पहिली. गावातील प्रमुख व्यक्ती, जसे की सरपंच, महिला मंडळ, बचतगट, शिक्षक, तरुण मंडळ, ग्रामस्थ व पालक यांना किशोरी विकास कार्यक्रमाची माहिती दिली. त्यासाठी त्यांच्या गाठीभेटी, बैठका घेतल्या व हा कार्यक्रम सुरू करण्याची सर्व तयारी पूर्ण केली.

त्यानंतर, प्रत्येक संघटीकेने तिच्या गावातील, १२ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरी मुलींचा सर्व्हे केला. त्यामुळे आम्हास, प्रत्येक गावातील किशोरीची संख्या समजली. त्यातील शाळेत जाणाऱ्या किती व न जाणाऱ्या किती याची माहिती मिळाली. किशोरींचा सर्व्हे झाल्यानंतर आम्ही कामास सुरुवात केली. परंतु, सुरुवातीस या कामात अनेक अडचणी आल्या. किशोरी विकास कार्यक्रमाबद्दल लोकांना मोठे कुतूहल होते. किशोरी विकास कार्यक्रम म्हणजे नेमके काय ? या कार्यक्रमात ही संस्था मुलींना नेमके काय शिकवणार ? त्यातून मुली उगीच नको ते शिकायच्या व नंतर तसेच वागायला, बोलायला लागायच्या, त्यामुळे घरात व गावात नको ते नवे प्रश्न निर्माण व्हायचे, त्यापेक्षा आमच्या मुलींना किशोरी विकास कार्यक्रमच नको अशी लोकांची सर्वसाधारण भावना तयार झाली होती. लोकांच्या मनातील या शंका चुकीच्या होत्या असेही म्हणता येणार नाही. कारण, किशोरी वय खूप नाजूक असते, या काळात मुलींना आपण जे जे शिकवू व सांगू त्याचा, त्यांच्या मनावर त्वरित व खोलवर परिणाम होतो. मुलींचे हे वय बंडखोर वृत्तीचे असते. या काळात त्यांच्यात मोठे शारीरिक व मानसिक बदल होत असतात. त्यामुळे किशोरी विकासाचे काम सुरू करतांना आम्ही, खूप काळजी घेतली व त्यासाठी भरपूर कष्टही घेतले. मात्र, या कार्यक्रमास पुढे मिळालेले यश पाहता, आमचे हे कष्ट सार्थकी लागले असेच म्हणावे लागेल.

हा कार्यक्रम सुरू केला त्यावेळी किशोरी मंडळात मुली कमी यायच्या. मुलींची मंडळात यायची इच्छा असायची परंतु, घरातील बंधनांमुळे त्या घाबरत होत्या. मात्र, मंडळात मुली कमी येत असल्या तरी निराश न होता आम्ही, किशोरी मंडळाचे काम सुरूच ठेवले. ज्या मुली मंडळात येत होत्या त्यांना, हळूहळू या कार्यक्रमांची गोडी वाटू लागली. त्या घरी गेल्यावर आपल्या आयांना मंडळातील अनुभव सांगत असत. किशोरी मंडळात आम्हाला खूप शिकायला मिळते, ऐकायला मिळते, वाचायला मिळते, खेळायला मिळते, कला गुणांना वाव मिळतो, चांगले वागण्या बोलण्याचे शिक्षण मिळते, विविध विषयावर माहिती मिळते वगैरे वगैरे. याप्रकारे, मुलींची मंडळातून मिळणाऱ्या फायद्याबाबत खात्री पटली व त्यामुळे त्यांची कार्यक्रमातील गोडी वाढली. मंडळात येणाऱ्या मुलींचे हे अनुभव त्यांच्यामार्फत, मंडळात न येणाऱ्या त्यांच्या मैत्रिणींपर्यंत पोहचले. त्याचप्रमाणे, या कार्यक्रमास विरोध असणाऱ्या लोकांपर्यंतही ते पोहचले. त्यामुळे, या कार्यक्रमाबाबत ग्रामस्थ व पालकांच्या मनात असलेल्या शंका कमी होत गेल्या व मंडळात न येणाऱ्या मुलीही नंतर हळूहळू मंडळात येवू लागल्या. आता पालक स्वतःच मुलींना मंडळात पाठवू लागले. याप्रकारे, मंडळातील मुलींची संख्या वाढत गेली. मंडळात नेमके काय चालते हे पाहण्यासाठी, काही वेळा मुलींच्या आयाही मंडळात यायच्या व कोपऱ्यात बसून, मुलींचा कार्यक्रम पहायच्या. किशोरी मंडळात मुलींवर होणारे चांगले संस्कार पाहून, आयाही सुखावू लागल्या. आमच्या वयात आम्हास हे काहीच शिकायला मिळाले नाही याचे त्यांना वाईट वाटायचे व त्या निराश व्हायच्या. पुरुषांच्या मनात थोड्याफार शंका असल्या तरी, मुलींच्या आयांना मात्र हा कार्यक्रम चांगला वाटू लागला होता व त्यामुळेच, त्यांचा या कार्यक्रमास पाठिंबा मिळत होता. किशोरी कार्यक्रमाची उपयुक्तता जशी लोकांच्या लक्षात येत गेली तसा, या कार्यक्रमास असणारा विरोध संपत गेला व सर्वांचे सहकार्य मिळू लागले.

याप्रकारे भूकंपानंतर एक वर्षाच्या आतच आमचा किशोरी विकास कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमातून किशोरी विकास कार्यक्रमाचे एक आदर्श मॉडेल तयार व्हावे या हेतूने आम्ही या कार्यक्रमात विविध उपक्रम राबविले. त्यातील काही प्रमुख उपक्रम .....

किशोरी मंडळ स्थापना :- हा कार्यक्रम सुरू करतांना प्रथम आम्ही, सर्व १५ गावात किशोरी मंडळांची स्थापना केली व मंडळात येणाऱ्या मुलींची सदस्य म्हणून नोंदणी केली. प्रत्येक किशोरी मंडळास मुलींनी त्यांना आवडणारी नावे दिली, जशी की, कमला नेहरू, इंदिरा गांधी, झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, जिजामाता, सरस्वती, चमेली, निशिगंधा, रजनीगंधा, जुई, सदाफुली, शेवंती, प्रभात व अभिनंदन. त्यानंतर, आम्ही सर्व मंडळाच्या नावांचे बोर्ड तयार करून, ते प्रत्येक मंडळात लावले. किशोरी मंडळासाठी गावात मध्यवर्ती ठिकाणी स्वतंत्र व बंदिस्त जागा निवडल्या. त्यात मंडळाचे सर्व साहित्य ठेवले. मंडळाची वेळ सायंकाळी ५-७ अशी २ तास होती. मात्र, संघटीका, मंडळासाठी दररोज तीन तास वेळ द्यायच्या. या प्रकारे किशोरी मंडळाची स्थापना होवून आमचे काम सुरू झाले होते.



किशोरी मंडळ दैनंदिन कार्यक्रम :- किशोरी मंडळात पूर्ण महिनाभर, विविध प्रकारच्या दैनंदिन कार्यक्रमांचे आयोजन केले जात असे. प्रत्येक मंडळात मुलींसाठी स्टडी सेंटर, हॉबी सेंटर, वाचनालय आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या होत्या. स्टडी सेंटरवर अभ्यासाची पुस्तके ठेवली होती. गरजू मुली तिथे अभ्यास करीत किंवा पुस्तके घरी घेवुन जात. त्याच प्रमाणे प्रत्येक मंडळात खेळांचे साहित्य ठेवले होते. वाचनालय पेटी व त्यात महिला व किशोरींशी संबंधित विविध विषयावरील पुस्तके ठेवली होती. याशिवाय, किशोरींमध्ये अधून मधून एखाद्या विषयावर चर्चा घडवून आणली जात असे. चर्चेसाठी मुली स्वतःच त्यांच्या आवडीचा विषय निवडीत. या चर्चेत किशोरींच्या मनातील विविध प्रश्नांना उत्तरे दिली जात. यातून त्यांच्या ज्ञानात भर पडून, त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडत होत होता. त्यांच्यात धीटपणा, संवाद कौशल्य, विचार करण्याची व निर्णय घेण्याची क्षमता वाढत होती. याप्रकारे अभ्यास वर्ग, सामुदायिक व वैयक्तिक खेळ, पुस्तके, चर्चा, संवाद, माहितीचे आदान प्रदान, शंकासमाधान आदी माध्यमातून दैनंदिन कार्यक्रम पार पडत होते.

किशोरी मंडळ साप्ताहिक सत्रे :- प्रत्येक किशोरी मंडळात, आठवड्यातून एक दिवस, साप्ताहिक सत्राचे आयोजन केले जात असे. त्यात किशोरी कार्यक्रमाशी संबंधित विविध विषय निवडून, त्यावर मुलींना मार्गदर्शन केले जात असे. उदा. अभ्यासाचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकास, वाचन व लेखनाची आवड, सुंदर हस्ताक्षर, व्यक्तिगत स्वच्छता, आरोग्य व आहार, घरकाम, परिसर स्वच्छता, सणावारांचे महत्व, अंधश्रद्धा, हुंडा, लग्नाचे वय, गावाची व ग्रामपंचायतीची माहिती, परिसर निरीक्षण, कथाकथन, गोष्टी सांगणे इत्यादी. त्यासाठी गरजेप्रमाणे बाहेरचे तज्ञ बोलावले जात तसेच गावातील सुशिक्षित व अनुभवी व्यक्ती, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, सरपंच, महिला मंडळ व तरुण मंडळ सदस्य तसेच संस्था कार्यकर्ते अशा मान्यवरांना मार्गदर्शनासाठी बोलावले जात असे. साप्ताहिक सत्रातून मुलींना मिळणारी माहिती, त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी खूपच उपयुक्त ठरली.

किशोरी मंडळ मासिक शिबिरे :- किशोरी मंडळात दरमहा एका ठराविक दिवशी, एखाद्या महत्त्वाच्या विषयावर, पूर्ण एक दिवसाचे शिबिर आयोजित केले जात असे. त्यासाठी विषयांची निवड मुलीच करीत. त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी त्या त्या विषयातील बाहेरील तज्ञ व्यक्तींना निमंत्रित केले जात असे. साप्ताहिक सत्रात एखाद्या विषयांवर संघटीका वा स्थानिक व्यक्तींना मार्गदर्शन करता आले नसेल तर, अशा विषयांवर मासिक शिबिरात पुन्हा मार्गदर्शन केले जात असे. साप्ताहिक सत्रात झालेले विषय सोडून, इतर महत्वाचे विषय मासिक शिबिरात घेतले जात असत. याशिवाय, मुलींच्या आवडीच्या काही विषयावर मुक्त चर्चा होत असे. मासिक शिबिरात किशोरींना विविध कौशल्य शिकवली जात. उदा. रांगोळी, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, हस्तकला, मनिऑर्डर करणे, बँकेत पैसे भरणे व काढणे, विविध खेळ, घरगुती उपकरणांची ओळख, दुरुस्ती व देखभाल, पाककृती, काजे बटण करणे, परसबाग आदी. सदर शिबिरांच्या आयोजनात संघटीका, सामाजिक कार्यकर्त्या व बाहेरील तज्ञ व्यक्तींचा महत्वाचा सहभाग असायचा. अशा शिबिरांमुळे मुलींना विविध विषयांवर भरपूर माहिती मिळत होती.

किशोरी मंडळ फिरती वाचनालये :- प्रत्येक किशोरी मंडळास वाचनालयाची पेटी दिली होती. सदर पेटीत महिला व किशोरींना उपयुक्त विषयांवर उदा. आरोग्य, आहार, माता बाल संगोपन, प्रथमोपचार, सामाजिक कायदे, थोरांची चरित्रे, देशाचा इतिहास, पर्यटन, शेती, परसबाग, पाककृती, मूल्य शिक्षण आदी विषयांवरील पुस्तके ठेवण्यात आली होती. किशोरींबरोबर गावातील महिलाही वाचनालयाचा लाभ घेत असत. मुलींना घरी वाचण्यासाठी पुस्तके घेवुन जायची असतील तर ती, दिली जात. वाचनालय सुविधा मोफत होती. मात्र, वाचनालयाचे सभासद होतांना महिला व मुलींना रजिस्टरमध्ये नोंद करावी लागत असे. एका पेटीतील पुस्तके वाचून झाल्यावर, दरमहा सर्व पेट्या, रोटेशन पद्धतीने सर्व किशोरी मंडळात फिरवल्या जात असत. एका पेटीत ४०-५० पुस्तके, याप्रमाणे सर्व १५ पेट्यात ६००-७०० पुस्तके ठेवण्यात आली होती. वर्षभराने पेट्यात नवीन पुस्तके जमा केली जात असत. त्यामुळे, सर्व मंडळातील, किशोरी व महिलांना वर्षभरात भरपूर पुस्तके वाचायला मिळत होती. वाचनालय उपक्रमास, महिला व किशोरींचा चांगला प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे मुलींच्या ज्ञानात भर पडून त्यांचा आत्मविश्वास व व्यक्तिमत्त्व विकास होत होता.

किशोरी मंडळ अभ्यास वर्ग :- सर्व किशोरी मंडळात, वाचनालयाच्या पुस्तकाबरोबरच, इयत्ता ८ वी ते १० वी साठी लागणाऱ्या पुस्तकांचे संच ठेवले होते. मंडळात येणाऱ्या ज्या मुलींकडे अभ्यासाची पुस्तके नाहीत, त्यांना अभ्यासा साठी ही पुस्तके घरी दिली जात असत. मुलींना या पुस्तकांचा अभ्यासासाठी चांगला उपयोग होत होता. आमचे मानसिक आरोग्य कार्यकर्ते, त्यांचे काम संपल्यावर संध्याकाळी मुलींसाठी अभ्यास वर्ग चालवायचे. इयत्ता ८ वी ते १० वीच्या मुलींना ते अभ्यासात मदत व मार्गदर्शन करीत असत. ज्या मुलींनी कौटुंबिक जबाबदारीमुळे शाळा सोडल्या होत्या व ज्यांची शिकायची इच्छा होती, अशा काही मुलींना १० वीच्या परीक्षेला बाहेरून बसता यावे म्हणून, त्यांच्यासाठी आम्ही विशेष अभ्यास वर्ग घेत होतो व त्यांना अभ्यासाची पुस्तकेही देत होतो. त्यामुळे, अभ्यासवर्ग हा उपक्रम, मुलींच्या शिक्षणासाठी खूपच उपयुक्त ठरला.

किशोरी मंडळ त्रैमासिक मेळावे :- प्रत्येक किशोरी मंडळात वरीलप्रमाणे कार्यक्रम राबविले जात होते व त्याचा किशोरींना खूप चांगला उपयोगही होत होता. मात्र, सर्व १५ गावातील किशोरींना एकत्र येण्याची संधी मिळावी, त्यांनी आपापल्या मंडळात चालणाऱ्या कार्यक्रमाविषयी एकमेकींशी चर्चा करावी, तसेच सर्व मंडळातील किशोरींच्या एकमेकींशी ओळखी व्हाव्यात, त्यांनी काही सामूहिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करावे या हेतूने दर तीन महिन्यांनी, पाच पाच गावातील किशोरी मंडळांचा एकेक गट तयार करून, वर्षभरात सर्व किशोरी मंडळात चार त्रैमासिक विभागीय मेळाव्याचे आयोजन केले जात असे. विभागीय मेळाव्याच्या निमित्ताने,१५ गावातील किशोरी, संघटीका, सामाजिक कार्यकर्त्या व प्रकल्प समन्वयक अशा सर्वांना, एकत्र येण्याची व एकत्रितपणे कार्यक्रम पार पाडण्याची संधी मिळत होती. त्यामुळेच, त्रैमासिक मेळावे हा उपक्रम, किशोरी कार्यक्रमात खूपच उपयुक्त ठरला होता. प्रश्न किशोरींच्या मनातले या विषयावर असाच एक मेळावा झाला होता व त्यातूनच प्रश्नमंजुषा ही प्रश्न किशोरींच्या मनातले व त्यांची उत्तरे देणारी पुस्तिका तयार झाली होती.

किशोरी मंडळ परसबाग :- किशोरी मंडळातील मुलींना आम्ही, परसबागेचेही प्रशिक्षण दिले. या ज्ञानाचा वापर करून, प्रत्येक मुलीने त्यांच्या घराजवळ, छोटीसी परसबाग तयार करावी अशी आमच्या अपेक्षा होती. त्यासाठी आम्ही त्यांना प्रेरित केले व त्यांना विविध भाजीपाल्यांचे बियाणे वाटप केले. परसबाग प्रशिक्षण वर्गात सर्व मुलींना पालेभाजी, फळभाजी, वेलभाजी, कंदभाजीची ओळख, रोपे तयार करणे व लागवडीची तंत्रे, वाफा तयार करणे, रोपांची व बियाण्याची लागवड, रोपांना पाणी खते देणे, औषध फवारणी, भाजीपाला काढणी अशा विविध विषयांवर माहिती दिली. स्वतः लावलेल्या बियांचे मातीत रुजने, त्याचा अंकुर बाहेर येणे, हळूहळू हा अंकुर वाढून त्याचे रोपात रूपांतर होणे, रोपांच्या वाढीचे निरीक्षण करणे, त्यास येणारी पाने, फुले, फळे पहाणे, नंतर त्याचे भाजीत किंवा फळात रूपांतर कसे होते याचे निरीक्षण करणे, या निर्मितीचा आनंद घेणे, आपण स्वतः पिकवलेली भाजी स्वतःच्या हाताने काढणे व ती खाणे, हा निर्मितीचा आनंद किती मोठा असतो हे मुलींच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसायचे. परसबाग कार्यक्रम हा नवनिर्मितीचा आनंद देणारा उपक्रम म्हणून, सर्वांनीच त्याचे खूप कौतुक केले होते. प्रत्येक मुलीने आपल्या परसबागेची नीट काळजी घ्यावी यासाठी आम्ही, मुलींच्या परसबाग स्पर्धाही आयोजित करायचो व पहिल्या तीन नंबरच्या मुलींना बक्षिसे द्यायचो.

ही बक्षिसे स्वीकारताना मुलींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद पहाणे हेच या कार्यक्रमाचे फलित होते.

किशोरी मंडळ अभ्यास सहली :- किशोरी मंडळातील, मुलींमध्ये धीटपणा यावा, त्यांची वृत्ती चौकस व्हावी, त्यांचा एकमेकीत मिसळण्याचा स्वभाव वाढवा, आपल्या गावच्या परिसराची व महत्वाच्या स्थळांची माहिती व्हावी व त्याद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास वाव मिळावा या हेतूने किशोरींसाठी अभ्यास सहलींचे आयोजन केले जायचे. २५-२५ च्या गटाने या सहली काढल्या जात असत. या सहली, परिसरातील साखर कारखाना, जिल्हा मध्यवर्ती रुग्णालय, जिल्हा न्यायालय, जनरल पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन, बँक, दूध डेअरी, पोल्ट्री फार्म, स्वयंसेवी संस्था अशा आस्थपणांना भेटीचे आयोजन केले जात असे. या आस्थपणांचे कामकाज कसे चालते याची माहिती, त्या त्या आस्थपनातील प्रमुख व्यक्ती, मुलींना देत व मुलींचे काही प्रश्न असतील तर त्याची उत्तरेही देत. यातून मुलींना, वेगवेगळ्या अस्थापणांची माहिती मिळत होती. याबरोबरच त्यांचे ज्ञान व आत्मविश्वासही वाढतांना दिसत होता.

महिला मंडळ बैठका व पालक सभा :- किशोरी कार्यक्रमात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आमच्या संघटीका व सामाजिक कार्यकर्त्या, गावातील महिला मंडळ सदस्य व पालकांची मदत घेत असत. त्यासाठी महिला मंडळ व पालक सभांचे नियमित आयोजन केले जात असे. महिला मंडळे व पालकांवरोबर बैठका आयोजित करण्यामुळे, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, सरपंच, पोलीस पाटील, शिक्षक, तरुण मंडळांचे तसेच सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते व अन्य व्यक्तींचाही सहभाग आम्हास या कार्यक्रमात मिळत असे. त्यामुळे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आम्हास अडचणी येत नसत किंवा आल्या तरी त्या सोडवण्यात या सर्वांची मदत होत असे.

किशोरी मंडळ स्पर्धा :- किशोरी मंडळातील, मुलींमध्ये कोणत्याही कामातील सकारात्मक स्पर्धा वाढावी यासाठी या कार्यक्रमात, आम्ही विविध स्पर्धांचे आयोजन करायचो. उदा.रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, परसबाग स्पर्धा, खेळांच्या स्पर्धा, गाणी गोष्टी स्पर्धा, संभाषण स्पर्धा, वाचन स्पर्धा, सर्वसामान्य ज्ञान स्पर्धा इत्यादी. या स्पर्धेतून प्रत्येक मंडळातील पहिल्या तीन मुलींची निवड केली जात असे. या बरोबरच किशोरींची मंडळातील उपस्थिती,कार्यक्रमातील सहभाग, शिबिरे व सत्रातील उपस्थिती, वाचनालय पुस्तकांचे वाचन आदी गोष्टींचा विचार करून, प्रत्येक मंडळातून अशा पहिल्या तीन मुलींची निवड केली जायची. प्रत्येक मंडळातील पहिल्या तीन क्रमांकाच्या मुलींना बक्षीसे दिली जात असतं तर, उर्वरित मुलींना त्यांच्या सहभागाचे प्रमाणपत्र दिले जायचे. अशा स्पर्धांच्या आयोजनामुळे मुलींचा कार्यक्रमातील सहभाग वाढत होता.

किशोरी मंडळ सण, उत्सव :- आपल्या देशात सर्व धर्मियांचे वर्षभर अनेक सण असतात. या सणांची माहिती किशोरींना व्हावी यासाठी, किशोरी मंडळात सर्व जाती धर्माच्या सणांची माहिती मुलींना दिली जात असे. त्यामुळे आपल्या सणांची व संस्कृतीची माहिती मुलींना होई. किशोरी मंडळात गणपती बसवणे, नवरात्रीत दांडियाचे आयोजन करणे, दसरा, दिवाळी, गुढी पाडवा, होळी, राखी, ख्रिसमस, गुड फ्रायडे, ईद, रमझान असे सर्व धर्मियांचे उत्सवाची माहिती दिली जात असे. त्याच प्रमाणे, थोर नेते, स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रपुरुष यांच्या जयंत्या,१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, असे राष्ट्रीय सणही साजरे केले जात असतं. मुलींना या सणांची, नेत्यांची व उत्सवाची माहिती व इतिहास सांगितला जात असे.

किशोरी कार्यक्रमाचा कालावधी :- याप्रकारे १९९५ पासून २००४ पर्यंत भूकंपग्रस्त भागात आमचा हा कार्यक्रम सुरू होता. आमच्या या कार्यक्रमाचे यश पाहून, भूकंपग्रस्त भागात काम करणाऱ्या इतर अनेक संस्थांनी आमच्या मार्गदर्शनाखाली, किशोरी कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमाचे हे फलित पाहून, महाराष्ट्रातील अनेक स्वयंसेवी संस्था संघटनांनी, आमच्या मार्गदर्शनाखाली, पुढे हा कार्यक्रम हाती घेतला. यातूनच पुढे किशोरी विकास कार्यक्रमाचे आदर्श मॉडेल म्हणून, आमची ही चळवळ, महाराष्ट्रभर विस्तारली होती.

ऋणनिर्देश :- अफार्मच्या भूकंपग्रस्त भागातील, महिला व किशोरी विकास कार्यक्रमांच्या प्रमुख या नात्याने स्मिता कुलकर्णी यांनी, या कार्यक्रमाची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली. त्यासाठी त्या, पुण्याहून लातूरला दरमहा किमान दोनदा जात असत. तसेच, अफार्म ट्रस्टी वसुधाताई सरदार यांचेही या कार्यक्रमात खूप मार्गदर्शन लाभले. लातूर प्रकल्पातील अभिजीत पाटील, बेबी कांबळे, सविता कुलकर्णी, घुले ताई, वनिता कुलकर्णी तसेच १५ संघटीका, ग्रामस्थ व पालक या सर्वांचेही त्यांना या कामात भरपूर सहकार्य मिळाले. त्यामुळे या सर्वांच्या संघटित प्रयत्नांमुळेच, हा कार्यक्रम यशस्वी झाला. त्यासाठी सर्वांचे आभार.

किशोरी कार्यक्रमाची, आज जास्त गरज आहे :- महिला व मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांचे प्रमाण सध्या वाढते आहे. त्यामुळे, आज या कार्यक्रमाची गरज अधिक वाढली आहे. त्यासाठी समाज, स्वयंसेवी संस्था व संघटनांनी, लोक चळवळ म्हणून हा कार्यक्रम हाती घ्यावा यासाठीच, किल्लारी भूकंपाच्या ३१ व्या स्मृतिदिना निमित्ताने मी हा लेख लिहिला आहे.

– **एम. एन. कोंढाळकर** (मा. कार्यकारी संचालक व ट्रस्टी, अफार्म, पुणे.)
९८२२०६८६५६

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### चार हजारांहून अधिक धावपटू, सायकलपटूंनी घेतली मतदान करण्याची शपथ

पुणे : पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि रोटरी क्लब ऑफ निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रनथॉन' कार्यक्रमात ४ हजारांहून अधिक धावपटू, सायकलपटूंनी आगामी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याची शपथ घेतली. आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत निगडी प्राधिकरण येथील नियोजित महापौर निवासाच्या ठिकाणी 'रनथॉन' चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महानगर पालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, रोटरी क्लब ऑफ निगडीचे अध्यक्ष सुहास ढमाले, रनथॉनचे संचालक केशव मानगे, नियोजित प्रांतपाल नितीन ढमाले, महापालिकेचे उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, किरण मोरे, मुकेश कोळप, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे,कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

### कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात गोंधळ; फेटे उडवून शेतकऱ्यांकडून निषेध

मुंबई : राज्य सरकारच्या कृषी विभागातर्फे देण्यात येणाऱ्या कृषी पुरस्कार सोहळ्यादरम्यान रविवारी वरळी येथील कार्यक्रमात गोंधळ उडाला. राज्यपालांच्या हस्ते सर्व विजेत्यांना पुरस्कार देण्याच्या मागणीसाठी हा गोंधळ झाला. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी मध्यस्थी केल्यानंतर शेतकरी शांत झाले. या गोंधळावर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली असून शेतकऱ्यांना अपमानित करणे चुकीचे असल्याचे सांगितले. कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या वर्ष २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षांचे ४४८ पुरस्कारांच्या वितरण सोहळ्याचे आयोजन वरळी येथील एन. एस. सी. आय. क्रीडासंकुलात करण्यात आले. या सोहळ्यास राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहिले. कृषीमंत्री धनंजय मुंडे आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना नागपूरला जायचे होते. त्यामुळे प्रत्येक गटात प्रातिनिधिक पुरस्कार देण्यात येतील, असे सूत्रसंचालकाने ऐनवेळी घोषित केले. यावरून शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. शेतकऱ्यांनी फेटे उडवून त्याचा निषेध केला. शेवटी मुंडे यांनी मध्यस्थी करीत सर्व शेतकऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊ, असे जाहीर केले. त्यानंतर पुरस्कार सोहळा सुरळीत सुरू झाला.

# प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक तयार झाले पाहिजेत : नरेंद्र पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ घेऊन राज्यात एक लाख तर सोलापूर जिल्ह्यात १० हजार उद्योजक तयार झाले. महामंडळाच्या व्याज परतावा योजनेमुळे नव्या उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. पंढरपूर येथे नव्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपकेंद्र सुरु करण्यात आले असून, महामंडळाच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक तयार झाला पाहिजे असे प्रतिपादन अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात १ लाख मराठा उद्योजक संख्या पूर्ण झाली.

### एक लाख मराठा उद्योजक संकल्पपुर्ती निमित्त जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा; अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या पंढरपूर उपकेंद्राचे उद्घाटन

त्यानिमित अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, लोकमंगल बँक, पंढरपूर अर्बन बँक, निशिगंधा बँक व अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने मराठा उद्योजक जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा श्रीयश पॅलेस, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास आमदार समाधान आवताडे, लोकमंगल बँक, पंढरपूर अर्बन बँक, निशिगंधा बँक अधिकारी पदाधिकारी, अखिल भारतीय मराठा महासंघाचे पदाधिकारी तसेच मराठा उद्योजक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री. नरेंद्र पाटील म्हणाले, जिल्ह्यात राष्ट्रीयकृत व सहकारी बँकेने महामंडळाच्या योजनेच्या लाभार्थ्यांना सहकार्य केले त्यामुळे जिल्ह्यात अनेक मराठा उद्योजक महामंडळाच्या माध्यमातून उभे राहिले आहेत. ग्रामीण भागातील मराठा तरुणांनी महामंडळाच्या योजनेचा लाभ घेऊन गावातच उद्योग व्यवसाय सुरू करावा. त्यातून आपली व समाजाची आर्थिक उन्नती करावी. तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हे व तालुक्यांचा दौरा करुन महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी युवकांना उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शन करुन मराठा समाजातील तरुण-तरुणींना उद्योजकांच्या प्रवाहात सामील केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच शासनाकडून मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. सारथीमार्फत देण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करीत आहेत पंढरपूर येथे सुरु करण्यात महामंडळाच्या उपकेंद्राचा सांगोला, मंगळवेढा, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार असून, जास्तीत-जास्त मराठा समाजातील तरुणांनी याचा लाभा घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकानी योजनेच्या लाभार्थ्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, जिल्ह्यामध्ये महामंडळाच्या माध्यमातून सुमारे २५ हजार लाभार्थी म्हणजे २५ हजार उद्योजक होण्याची संधी दिली. पंढरपूर येथील अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या उपकेंद्राच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्यातील तसेच परिसरातील मराठी तरुणांना लाभ होणार आहे. जास्तीत-जास्त मराठी तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच या योजनेचा लाभ घेतल्यास त्याचा परतावाही वेळेत करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.




यावेळी यशस्वी उद्योजक व लाभार्थी रोहित पवार यांनी आपले अनुभव कथन केले. तसेच अर्जुन पवार, प्रणव परिचारक यांनी मेळाव्यात आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी योजनेचे लाभार्थी तसेच राष्ट्रीयकृत व सहकारी बँकेच्या अधिकारी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. पंढरपुरातील महामंडळाच्या उपकेंद्राचे उदघाटन पंढरपूर येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या उपकेंद्राचे उद्घाटन अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. या महामंडळाच्या उपकेंद्राचा सांगोला, मंगळवेढा, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील नारिकांना होणार आहे.

# भिगवण येथील नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर /अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील भिगवण येथे माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रवीण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास भिगवणकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली. भिगवण ग्रामपंचायत कार्यालय येथे सकाळी दहा ते पाच या वेळेत ८६४ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ३९४ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १६ नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.




पुढील ८ दिवस तालुक्यातील पळसदेव, बिजवडी, काटी, वडापुरी, निमगाव, निमसाखर, सणसर, लासुर्णे, निरवांगी, माळवाडी, इंदापूर, कळस, वालचंदनगर, बावडा, लाखेवाडी या ठिकाणी हे शिबिर पार पडणार आहे तरी याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी प्रवीण माने यांनी केले.

भिगवण येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे दादासाहेब थोरात, आप्पासो गायकवाड, पंकज काशिद, प्रसाद जगताप यांनी आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सरपंच दीपिकाताई क्षीरसागर, उपसरपंच मुमताज शेख, प्रदीप गायकवाड, मनोज राक्षे, अण्णासाहेब धवडे, मनोहर बापू हगारे, तुषार क्षीरसागर, जावेद शेख, केशवराव भापकर, कुंडलिक धुमाळ, निलेश मोरे, धनंजय थोरात, महेश जगताप, आकाश बंडगर, जयश्रीताई धुमाळ, दादा मारकड, छगन बनसुडे, नागेश गायकवाड, श्रीकांत काशीद, शरद शिर्के, गणेश मोहिते व भिगवण येथील आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

# सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षण शास्त्र व विस्तार विभागामध्ये एकदिवसीय लेट अस ड्रीम,कम्युनिटी इंटरव्हेन्शन कॉन्फरन्स

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/ प्रतिनीधी :सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षण शास्त्र व विस्तार विभागामध्ये एकदिवसीय लेट अस ड्रीम; कम्युनिटी इंटरव्हेन्शन कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले होते, ख्राईस्ट अभिमत विद्यापीठ व सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कॉन्फरन्सचे उद्दिष्ट होते की, विविध क्षेत्रात समाजकार्य करणाऱ्या पण प्रकाशझोतात नसणाऱ्या स्वयंसेवी व्यक्तींचे गौरव करून त्यांचा कामाबद्दल जाणून घेणे. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समाजकार्याबद्दल प्रेरित करणे.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी पुणे विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. विजय खरे, शिक्षण शास्त्र प्रशालेचे संचालक प्रा. विलास आढाव, शिक्षण शास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. गीता शिंदे व ख्राईस्ट अभिमत विद्यापीठाचे अधिष्ठाता फादर लीजो हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, दिव्यांग अभ्यास व सर्व समावेशक केंद्राचे समन्वयक श्री. धनंजय भोले यांनी केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रा. विजय खरे म्हणाले की, विद्यार्थ्यांना समाजकार्याविषयी प्रेरित करण्यासाठी व समाजाचा सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या आयोजनांची गरज आहे. तर प्रा.विलास आढाव यांनी समाज संघटनेचे महत्त्व विषद केले.

समाजकार्याविषयी बोलणाऱ्या १२ व्यक्तींची शिक्षण, समाजकार्य व आरोग्य या ३ गटांमध्ये विभागणी करून गटचर्चा करण्यात आली. यामध्ये डॉ. रवींद्र नांदेडकर, माधवी पटवर्धन, तुषार कांबळे, श्रूत फरांदे, डॉ. स्वाती सदाकळे, मॅथीव ड्येनियल इत्यादी व्यक्ती सहभागी झाले होते.त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप समारंभाम



ध्ये राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. रवींद्र शिंगणापूरकर व विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री. डी. पी. पवार व श्री. कृष्णा भंडाळकर उपस्थित होते. समारोप समारंभामध्ये बोलताना श्री. रवींद्र शिंगणापूरकर म्हणाले की, राष्ट्रनिर्मितीसाठी आजच्या कार्यक्रमामध्ये समाविष्ट झालेल्या समाज कार्य करणाऱ्या व्यक्तींचे मोलाचे योगदान असेल. कॉन्फरन्ससाठी १५० हून अधिक विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग मिळाला.

# विद्यापीठ उपपरिसरात जिल्हास्तरीय अविष्काराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/सुधाकर रणदिवे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन व नावीन्यता स्पर्धेचे आयोजन दि.१० ऑक्टोंबर रोजी विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रतिभा आणि क्षमतांचा अविष्कार व्हावा त्यांच्यामध्ये संशोधन जाणीव विकसित होऊन त्यांना अधिछात्र वृत्तीच्या स्वरूपात बळ मिळावे यासाठी राज भवन द्वारे २००६ पासून आविष्कार या अंतर्गत संशोधन व उपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.




ज्ञान शाखा निहाय सहा गट: पहिला गट मानव्यविद्या, भाषा आणि ललित कला, दुसरा गट- वाणिज्य व्यवस्थापन व विधी, तिसरा गट- विज्ञान, चौथा गट: कृषी व पशुसंवर्धन, पाचवा गट: अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, आणि सहावा गट :औषध निर्माण शास्त्र यांचा समावेश आहे.

यावर्षीचा राज्यस्तरीय आविष्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे जानेवारी २०२५ मध्ये संपन्न होणार आहे. यासाठीची पूर्वतयारी म्हणून कुलगुरू प्रा. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय अविष्कार अधिवेशनाचे आयोजन करून त्यानंतर विद्यापीठ स्तरीय अविष्कार संपन्न होणार आहे. शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील संशोधन कल्पकता व नओप क्रमांना अधिकाअधिक विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी यावर्षीचा अविष्कार प्रथमता जिल्हास्तरावर घेण्यात येत आहे. दिनांक ८ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर व जालना आणि १० ऑक्टोबरला बीड व धाराशिव येथे संपन्न होत आहे, यासाठी नोंदणी चालू आहे.

विद्यार्थ्यांचे तीन स्थर आहेत जसे की पदवी ( युजी) पदव्युत्तर पदवी,(पिजी ) आणि पदव्युत्तर पदवीनंतरची पदवी (पोस्ट पीजी) यात भाग घेण्यासाठी वयोमर्यादा पदवी वय वर्षे २५ पदव्युत्तर पदवी ३० वर्षे आणि पोस्ट पीजी करिता वयोमर्यादा नाही. धाराशिव जिल्हा समन्वयक म्हणून प्रा. आनंद देशमुख, डॉ. सादिक बागवान आहेत. सदर आविष्कार हा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय फुलारी, कुलगुरू प्रा. वाल्मीक सरवदे, कुलसचिव प्रा. प्रशांत अमृतकर, संचालक प्रा. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनात होत आहे. यामध्ये अधिकाधिक महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान विद्यार्थी विकास संचालक डॉ. कैलास अंभोरे, अविष्कार चे समन्वयक डॉ. भास्कर साठे, संयोजक डॉ. सुयोग अमृतराव, डॉ. महेश माने यांनी केले आहे.

# निवासी शाळा नंगपूरा-मुर्री कबड्डी संघ विजयी होऊन विभागावर खेळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : तालुक्यातील नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या चमुने वयोगट १४ संघ तालुका जिल्हास्तरिय कबड्डी खेळात प्रथम क्रमांक पटकवून विजयी झाला. आता हा संघ विभागीयस्तरावर खेळणार आहे.

सदर सांघिक खेळ हे क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी गोदिंया अंतर्गत कबड्डी मुले असे खेळ सुरू आहेत. सदर स्पर्धा ही क्रीडा संकुल गोदिंया या पटांगणावर विजयी सामना (दि.२९) दुपारी ०३.०० वाजता दरम्यान झाला. यामध्ये गोदिंया

### विजयी संघ विभागावर खेळणार; जिल्हास्तरीय कबड्डी प्रथम क्रमांक

जिल्ह्यातील कबड्डी वयोगट १४, १७ व १९ असे होते. यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री या चमुने सहभाग घेऊन वयोगट १४ जिल्हास्तरीय कबड्डी प्रथम क्रमांक मिळवून विजयी झाला आहे.

यामध्ये सहभागी विद्यार्थी प्रशांत रक्षा, हेमंत उईके, सागर कोहरे, आदित्य कोकोडे, आदित्य जमदाळ, आर्यन सोनवणे, विक्रांत टेंभूर्णे, गौरव जमदाळ, धृप लटये, तन्मय बागडे दक्ष मेश्राम तसेच मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी सराव करून घेतले. मुन्नाभाई नंदागवळी यांनी कबड्डी खेळाचे नवनवीन टिप्स देत, सकाळ सायंकाळी सराव करवून विजय प्राप्त केले. विजयाच्या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खूरपुडे, ए. बी. मरस्कोल्हे यांच्यासह सहायक आयुक्त विनोद मोहतूरे यांच्या नेतृत्वात शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी अभिनंदन करत शाळेचे शिक्षक कार्तिक शहारे, प्रदिप




ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण, तुषार महाजन आदी शाळेतील कर्मचारी व बाह्य स्रोत कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लाडकी बहीण योजना ही कायम स्वरूपी : अर्चनाताई पाटील

## अर्चनाताई यांच्या हस्ते १००० साड्यांचे करण्यात आले वाटप

# नळदुर्ग येथे बौद्ध विहार, बसवेश्वर महाराज सृष्टी , वसंतराव नाईक स्मारका सह नळदुर्ग तालुक्याचा प्रश्न मार्गी लावणार : राणा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातल्या महिलांचा सन्मान वाढविण्याचे काम प्रामाणिक पणाने केलं आहे महिलांचा आत्मसन्मान वाढला पाहिजे हा हेतू लक्षात ठेऊन आपली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना चालू केली आहे , ही योजना कायम स्वरूपी आसुन दरमहा १५०० रुपये प्रमाणे वर्षाला १८००० हजार रुपये लाडक्या बहिणीला मिळणार आहेत , विरोधक ही योजना बंद पडणार आहे अशा प्रकारचा भास नागरिकात पेरत आहेत परंतू महिलांच्या उत्कर्षासाठी अनेक योजना चालू करून नळदुर्ग





इतिहासात १०,००० बेरोजागाराना त्यांच्या हाताला काम मिळणार आहे . याच बरोबर बौद्ध विहार , महात्मा बसवेश्वर महाराज सृष्टी वसंतराव नाईक स्मारक , नविन पाईप लाईन , पाणी टाकी एम आय डी सी यांच्या सह नळदुर्ग तालुक्याचा प्रश्न मार्गी लावणार आहोत आसे परखड प्रतिपादन तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केले .

नळदुर्ग येथे अंबाबाई मठात नळदुर्ग शहरात गरीब महिलांना राणा जगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांच्या वतीने साड्या वाटप करण्यात आले त्या प्रसंगी ते बोलत होते .

यावेळी भाजपाचे नेते सुशांत भुमकर , नेते रणजितसिंह राजा ठाकुर , माजी नगरसेवक संजय बताले , माजी प्रभारी नगराध्यक्ष नय्यर जाहागीरदार , शहराध्यक्ष धिमाजी घुगे , पद्माकर घोडके , गणेश मोरडे माजी चेअरमन दत्तात्रय कोरे , संजय विठ्ठल जाधव , बबन चौधरी श्रमिक पोतदार , सागर हजारे , निरंजन राठोड , डॉ स्वातीताई जितेंद्र पाटील , कल्पनाताई गायकवाड , छमाबाई राठोड बबलू रणे , पांडु पुदाले , बंडु पुदाले , संभाजी कांबळे , सह महायुती चे भरगच्च कार्यकर्ते उपस्थित होते . कार्यक्रम संपल्यानंतर १००० महिलाना स्वःत अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते साडी वाटप करण्यात आली .

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कदापी बंद होणार नाही कारण ही योजना महायुती सरकारने बंद पाडण्यासाठी चालू केली नाही माझ्या लाडक्या नंदानी घाबरून जायचं नाही, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी केले तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांचे आगमन होताच महिलांनी गुलाब पुष्पाची उधळण करत या दोघांचं स्वागत केले.**

सागर डुकरे यांनी रांगोळीच्या माध्यमातून लाडकी बहीण योजनांची प्रतिकृती काढली आसुन सागर डुकरे यांचे आमदार राणा पाटील यांनी डोक्यावर हात ठेवून कौतुक केले कार्यक्रमाच्या स्थळा समोरील रांगोळी हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन माधुरी पद्माकर घोडके यांनी केले तर शेवटी आभार कल्पनाताई गायकवाड यांनी मानले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४ 

## थोडक्यात

### विरमाता शांताबाई बनसोडे यांचे निधन



नळदुर्ग : मरणोत्तर किर्ती चक्र विजेते शहीद वीर माजी सैनिक यशवंत मारूती बनसोडे यांच्या मातोश्री शांताबाई मारुती बनसोडे रा.बौध्द नगर नळदुर्ग यांचे आज दि.२९/०९/२०२४ रोजी दुपारी ठिक ४.०० वा.दरम्यान वृध्दापकाळी वयाच्या ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,सुना, नातवंडे असा परिवार आहे. उद्या दि.३०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा.दरम्यान त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.

### एशियन टॅलेंट लोकसेवा पुरस्कारासाठी जाहीर आवाहन

मुंबई : आदर्श मुंबई व विबोधी फाउंडेशन , महाराष्ट्र यांच्या तर्फे १२ व्या वर्धापन दिनाच्या औचित्याने महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय, पत्रकारिता , कला, क्रीडा, पर्यावरण, ग्राम विकास आदी क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय समाजकार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींचा विशेष सन्मान मुंबईत मान . नामदार श्री. नरहरी झिरवळ - विधानसभा उपाध्यक्ष , महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते ऑक्टोबर २०२४ मध्ये करण्यात येत आहे . भावी वाटचाल तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी घ्या उद्देशाने एशियन टॅलेंट गोल्डन आयकॉन २०२४ ह्या मानाच्या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. .

सन्मानपत्र आणि भेटवस्तू असे पुरस्काराचे स्वरूप असून इच्छुकांनी आपला प्रस्ताव दिनांक १० ऑक्टोबर २०२४ पूर्वी वॉटस् अप क्रमांक ९८१९१४५३५४ यावर पाठवण्याची विनंती अध्यक्षा सौ . वर्षा यादव यांनी केल्याचे आयोजक डॉ संजय भोईर व भालचंद्र पाटे व पूनम पाटगावे यांनी कळविले आहे .

# महिलांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठी लाडकी बहीण योजना : आमदार राणा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : महिलांना आर्थिक आधार देण्यासाठी व त्यांचा स्वाभिमान व सन्मान करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकार राबवित आहे. यामुळे महिलाचं सक्षमीकरण होणार आहे .म हायुती सरकारने महिलांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठीच ही योजना राबवीत आहेत. विरोधक योजना बंद पडणार आहे असे खोटे अपप्रचार करीत आहेत त्यांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांची जागा दाखवा अशी प्रतिक्रिया भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी बोलताना केली. तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत स्त्री शक्तीचा सन्मान सोहळा व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते .आमदार राणाजगजीतसिंह पाटील व धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते महिलांना साड्या वाटप करण्यात आले. यावेळी आयोजित महिला मेळाव्यात आमदार पाटील बोलत होते. याप्रसंगी आमदार पाटील यांच्या शुभहस्ते खुदावाडीत विविध विकास कामाचा शुभारंभ व लोकार्पण करण्यात आले.



याप्रसंगी धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष आर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील, भाजपाचे धाराशिव जिल्हा सरचिटणीस तथा महामंत्री ऍड.दीपक आलुरे, सरपंच सरोजिनीताई रेवणसिद्ध कबाडे, तांडा समृद्धी योजनेचे धाराशिव जिल्ह्याचे अशासकीय सदस्य प्राचार्य संतोष चव्हाण, भाजपा तांडा वस्ती संपर्क अभियानाचे धाराशिव जिल्हा संयोजक प्रवीण पवार, भाजपा खुदावाडी शाखा प्रमुख तुकाराम बोंगरगे, भाजपाचे भिवा इंगोले, भाजपा मिडिया सेल ता.प्रमुख तथा प्रत्रकार किशोर धुमाळ पत्रकार आर.पी.आय.सचिव एस.के.गायकवाड सुरेश लोंढे, रामसिंग परीहार, बाळु पवार, किशोर सुरवसे, व्यंकट साळुंखे, कल्याण बिराजदार, गुजनूर सरपंच फुलचंद वाघमारे, दिपक जाधव, अनिल पवार, तांडा समृद्धी योजनेची धाराशिव जिल्हा सह प्रवाशी दामाजी राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार राणा पाटील म्हणाले की, मागील काळात महाविकास आघाडी सरकारने तुळजापूर मतदारसंघात म्हणावा तसा विकास केला नाही. जनतेने धाराशिव लोकसभा निवडणुकीत विरोधकाला खासदार म्हणून निवडून दिलात पण त्याचा तुळजापूर मतदारसंघात खरचं काही उपयोग आहे का? असा सनसनाटी आरोप विरोधकावर करीत आपण महायुती सरकारच्या काळात प्रचंड निधी आणून जिल्ह्याचा व तुळजापूर मतदारसंघाचा विकास करतोय तसेच महिला वरील अन्याय अत्याचार विरोधात महिलांच्या सेवेकरीता हेल्पलाईन सुरू करीत आहे एक फोन करा नक्कीच आपणास मदत करणार असून लाडकी बहीण म्हणून आपल्या पाठबळाची मला गरज आहे. नळदुर्ग येथे महात्मा बसवेश्वर सृष्टी, वसंतराव नाईक स्मारक, बौद्ध विहार, एम आय डी सी , शादी खाना यासह नळदुर्ग तालुका निर्मितीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याची माहीती दिली. आयोजित स्त्री सन्मान सोहळा व महिला मेळावा कार्यक्रमात कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक ताराबाई पवार, बंजारा क्रांती दलाचे युवा आघाडी जिल्हाप्रमुख महेश चव्हाण, भाजपाचे खुदावाडी बुथ प्रमुख आनिल पवार, विकास सांगवे, धनराज सालगे, महिला बुथ प्रमुख गुरूदेवी तुकाराम बोंगरगे, विद्या बिराजदार, पार्वती बिराजदार, कोमल झेंडारे, रेखा कदम दहीटणा सरपंच शिवकांता कांबळे, भागश्री माने, नेताजी माडजे,गौरा प्रकाश सालगे, अमरजा प्रकाश कबाडे, सिमा विलास पवार सह भाजपाचे कार्यकर्ते, बचत गटातील महिला, खुदावाडी पंचायत समिती गटातील, वागदरी, गुजनूर, दहीटणा येडोळा रामतीर्थ सह गावातील हजारो महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## नळदुर्ग महाविदयालयात स्वच्छता ही सेवा-२०२४ निमित्त विविध कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड): नळदुर्ग ता.तुळजापूर येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात ' स्वच्छताही सेवा-२०२४' अंतर्गत १७ संप्टेबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'स्वभाव स्वच्छता आणि संस्कार स्वच्छता ' पंधरवाडा साजरा करण्यात येत असून या निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. प्रथमतः महाविदयालयात प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, ग्रीन क्लब समन्वयक, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी आणि सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विध्यार्थी विध्यार्थीनीनी स्वच्छेतेची शपथ घेतली.त्यानंतर ह्या स्वच्छता पंधरवाडा बाबतचे महत्त्व आणि महाविदयालयीन विद्यार्थ्यांची भूमिका याबाबत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.दादासाहेब जाधव यानी विषद केली तर प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यानी स्वच्छेते विषयी विविध कार्यक्रम कोणते व कसे घ्यायचे याबाबत मार्गदर्शन केले.

त्यानंतर महाविदयालयातील ग्रीन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनातील विद्यार्थी विद्यार्थ्यांनीनी महाविद्यालय परिसरातील कचरा प्लॉस्टीक, गवत,वृक्षाजवळील तृण आदी स्वच्छता करून सर्वजण नळदुर्ग बसस्थानक या ठिकाणी जावून सर्व बसस्थानक परिसर स्वच्छ करून ओला, सुका कचरा, प्लास्टीक आदी वेगळे करून कचरा कुंडीत टाकण्यात आला. त्यानंतर काही दुकानदार आणि नागरिकांच्या स्वच्छतेविषयीच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि नळदुर्ग वासियानी या कार्याचे महाविद्यालयाचे आणि विध्यार्थ्यांचे कौतूक आणि अभिनंदनही केले. पुढे नळदुर्ग येथील सर्व वासियांची आलियाबाद येथील असलेल्या स्मशानभूमिकडे विद्यार्थ्यांचा ताफा वळवला गेला आणि तेथील सर्व कचरा, घाण, वाढलेली झाडे गवत काढले गेले. त्यानंतर नळदुर्ग येथील असलेल्या भूईकोट किल्याच्या पायथ्याला असलेल्या आणि स्मशान भूमिच्या बाजूला असलेल्या नदीतील कचरा, प्लॉस्टीक, शेवाळ, लाकडे आदी स्वच्छ करण्यात आले. ही मोहीम यशस्वी होण्यासाठी ग्रीन क्लब समन्वयक प्रा डॉ उध्दव भाले, प्रा डॉ निलेश शेरे प्रा डॉ हंसराज जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा दादासाहेब जाधव, प्रा बाबासाहेब सावते, प्रा डॉ युवराज पाटील, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी लेप्टन्ट प्रा डॉ अतिश तिडके यांनी परिश्रम घेतले. ह्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमूख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विध्यार्थी विध्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संघटनेची माढा कार्यकारणी जाहीर; शिक्षक भारती संघटनेच्या माढा तालुकाध्यक्षपदी संतोष आटोळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अतुल सोनकांबळे इंदापूर, (प्रतिनिधी) : शिक्षकांच्या प्रश्न सोडवण्यासाठी लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या शिक्षक भारती संघटनेच्या माढा तालुका कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष सुजित कुमार काटमोरे आणि जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली असून माढा तालुका अध्यक्षपदी नूतन विद्यालय कुर्डूवाडीचे संतोष भगवान आटोळे, तर उपाध्यक्षपदी पूज्य सुगंधाताई विद्यालय भुताष्टेचे उल्हास महादेव उबाळे यांची तसेच नूतन विद्यालय कुर्डूवाडी चे सचिन मधुकर भोंग यांची तालुका सचिवपदी व कुर्मदास विद्यालय लऊळचे प्रवीण शंकर जाधव यांची तालुका संघटकपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये माढा तालुका नूतन कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड, शहराध्यक्ष देवदत्त मेटकरी, उपाध्यक्ष आत्तार, जिल्हा संघटक शरद पवार यांनी सर्व नूतन माढा तालुका पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. त्याप्रसंगी शिक्षक भारती संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी माढा तालुका नूतन कार्यकारणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे म्हणाले, शिक्षकांचे शासन स्तरावर कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही यासाठी शिक्षक भारती संघटना पुढाकार घेत असून निस्वार्थपणे शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तर प्रवक्ते विजयकुमार गुंड म्हणाले संघटनेची ताकद काय असते हे शिक्षक भारतीचे शिक्षकांचे प्रश्न सोडवत असताना लक्षात येते त्यामुळे अनेक वर्ष प्रलंबित असलेली कामे सुटत आहेत.

यावेळी बोलताना माढा तालुका नूतन अध्यक्ष संतोष आटोळे म्हणाले, शिक्षक भारती संघटनेच्या माढा तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन शिक्षक भारती परिवाराने जो विश्वास टाकला आहे तो पूर्णपणे सार्थ ठरवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करू शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी निस्वार्थपणे भूमिका घेऊ तसेच संघटना वाढीसाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. यावेळी उपस्थितांचे आभार नूतन सचिव सचिन भोंग यांनी मांनले.

## करमाळ्यामध्ये बाईक रॅली काढून धर्मवीर आनंद दिघे यांच्यावर आधारित चित्रपटाच्या पहिल्या प्रयोगाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्यावर आधारितधर्मवीर २या चित्रपटाच्या पहिल्या प्रयोगाचे उद्घाटन शहरातील छोटे महाराज थेटर येथे वाघाचे सरपंच ऋतुराज राज सावंत यांच्या उपस्थितीत आणि पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले उद्घाटन पूर्वी २७ सप्टेंबर म्हणजे क्रांती दिनाच्या पार्श्वभूमीवर दिघे साहेबांना वंदन म्हणून सकाळी अकरा वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढली.

महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी या सिनेमात स्वतःचीच व्यक्तिरेखा सहकार्य आहे त्यामुळे सिनेसृष्टीतील राजकीय वर्तुळातील सर्वांच्या भया उंचावल्या आहेत. करमाळा तालुका शिवसेना युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांना धर्मवीर टू हा सिनेमा मोफत दाखवण्यात येणारा असून करमाळा तालुक्यात केवळ छोटू महाराज हे एकमेव सिनेमा थेटर असल्याने शहर व परिसरातील नागरिकांना हा चित्रपट पाहता यावा म्हणून तिकीट दर कमी केले असलेली माहिती युवा सेना जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे यांनी दिली आहे.

धर्मवीर टू च्या उद्घाटन प्रसंगी युवा सेना कुणाल पाटील यांच्यासह युवा सेना शहरप्रमुख विशाल गायकवाड युवासेना उपजिल्हाप्रमुख श्रीकांत गोसावी युवा सेना तालुकाप्रमुख दादासाहेब तनपुरे शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख प्रियंका गायकवाड भाजपा शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल बजरंग दल गोरख शहर प्रमुख कराना लाट



युवा युट्युब ग्लोबल आकाश शिंदे अँड प्रियंका अग्रवाल युवा सेना उपताल व प्रमुख विनोद शिंदे उपशहर प्रमुख अनिकेत यादव सहकार सेनेचे तालुकाप्रमुख गोसावी उप तालुका प्रमुख ज्योतीराम काळे सहसचिव श्रीकृष्ण शिंदे तुषार झाकणे गणेश रायकर शुभांगी गोसावी सुमित पवार अनमोल लोंढे दत्ता ठोंबरे नंदू पाटील विशाल शिंदे अशोक पाटील निलेश कांबळे आधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्राचा सातबारा अदानींच्या नावे लिहिणार का? विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा सवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : चंद्रपूर येथील माऊंट कार्मेल कॉन्व्हेंट उच्च माध्यमिक शाळा अदानी व्यवस्थापनाला हस्तांतरित करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी टीकास्त्र सोडले आहे. महाराष्ट्राला महायुती सरकारएवढाच अदानींचाही धोका आहे. विमानतळ, वीज, धारावी आणि आता शाळेवर अदानींचा डोळा आहे. महायुती सरकार महाराष्ट्राचा सातबारा अदानीच्या नावे लिहिणार का, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

राज्य सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे शनिवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी शाळेच्या भिंतीवर लावलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांसोबत आता गौतम अदानी यांचे छायाचित्रही लावण्याची तयारी शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सरकारकडून सुरू झाल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

देशाला शिक्षणाचा मार्ग देणाऱ्या महाराष्ट्रावर आज अदानी समूहाच्या हातून बाराखडी लिहिण्याची वेळ आली आहे. जमीन, उद्योगांबरोबरच सरकार आता शाळाही अदानींच्या ताब्यात देत आहे. महाराष्ट्र विक्रीला काढल्याचे हे उत्तम उदाहरण आहे, असे दानवे यांनी म्हटले आहे.

### दप्तर गहाळ केल्याने कारवाई करण्याची मागणी

### संतोष मिसाळ यांची प्रकृती खालावली

# इंदापूर पंचायत समिती इंदापूर समोर होणार वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रस्ता रोको

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अतुल सोनकांबळे, इंदापूर प्रतिनिधी : मौजे वरकुटे खुर्द, तालुका इंदापूर जिल्हा पुणे या ग्रामपंचायतचे स्थापनेपासूनचे मुळ नमुना नंबर आठ चे रजिस्टर गहाळ केले असल्याने वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष संतोष मिसाळ हे गेली चार दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. तरीही इंदापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याने वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजकुमार साहेब यांचे







नेतृत्वाखाली जिल्हा व तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे संतोष मिसाळ यांच्या उपोषणाला न्याय मिळण्यासाठी म्हणजेच तत्कालीन ग्रामसेवक मल्हारी येदु झगडे व तत्कालीन सरपंच शिवाजी दशरथ यादव यांचेवर दप्तर गहाळ केल्याने ग्रामपंचायत अधिनियम १७९/२ प्रमाणे कारवाई करण्याचे मागणीसाठी सोमवार दिनांक ३०/०९/२०२४ रोजी इंदापूर पंचायत समितीच्या समोर रस्ता रोको आंदोलन करणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजकुमार साहेब यांनी सांगितले आहे. या बाबत त्यांनी इंदापूरचे तहसीलदार तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व इंदापूर पोलीस स्टेशनला तसे निवेदन दिले. असल्याने प्रशासन काय भूमिका घेणार याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.